**विशेष दिवाणी दावा क्र. ४८/२०१९**

*CNR No. MHSO060005862019*

द्रौपदी वाघमोडे

वि.

बिरा कोकरे मयत वगैरे

**आदेश निशाणी क्र. २२ आणि निशाणी क्र. १ वर**

प्रतिवादी क्र. ८ निवृत्ती बिरा कोकरे आणि प्रतिवादी क्र. ९ पांडुरंग बिरा कोकरे यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्यात यावा असा आदेश करण्यात आला आहे. कोविड–१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावामुळे प्रतिवादी क्र. ८ व ९ हे हजर होऊन कैफियत देऊ शकले नाहीत. तरी त्यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्यात यावा यासाठी हा अर्ज देण्यात आला आहे.

०२. त्यावर वादी यांनी आक्षेप नोंदवला आहे. अर्ज मुदतीत नाही. तो योग्य व कायदेशीर नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

०३. प्रकरणामध्ये वादमुद्दे निश्चित करण्यात आले आहेत. वादी द्रौपदी यांनी त्यांचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. हा दावा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणे वगैरे मागणीसाठीचा आहे. वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. प्रतिवादी क्र. ८ आणि ९ यांनी या अर्जासोबत त्यांची कैफियत दिली आहे. या दाव्याचा गुणदोषावर अंतिम व योग्य न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी क्र. ८ आणि ९ यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्याच्या झालेला आदेश रद्द करुन त्यांनी दिलेली कैफियत रेकॉर्डवर घेणे न्यायाच्या दृष्टीने योग्य राहील. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ८ आणि ९ यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे. त्यांनी दिलेली कैफियत रेकॉर्डवर घेण्यात येत आहे.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR

Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.12.09 12:40:38 +0530

दि. ०९/१२/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 09/12/2022 |
| Order uploaded on | : | 09/12/2022 |